# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
## Date – 08 April 2024
## Time 7.10 AM to 7.20 AM
## Language Marathi
## **आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**
## **प्रादेशिक बातम्या**
## **दिनांक ०८ एप्रिल २०२४ सकाळी ७.१० मि.**

****

- लोकसभा निवडणुकीसाठी महाराष्ट्रासह सहा राज्यांत विशेष निरीक्षकांची नियुक्ती
- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची महायुतीच्या उमेदवारांसाठी आज चंद्रपुरात प्रचार सभा
- वंचित बहुजन आघाडीची बीड इथून अशोक हिंगे पाटील यांना उमेदवारी
- आयपीएल क्रिकेट स्पर्धेत मुंबई इंडियन्स संघाचा हंगामातला पहिला विजय
- राज्यस्तरीय महिला कुस्ती स्पर्धेत अहमदनगरची भाग्यश्री फड ठरली महाराष्ट्र केसरी

आणि

- हिंगोली जिल्ह्यात नरसी नामदेव इथल्या यात्रेची काल्याच्या कीर्तनानं सांगता

****

केंद्रीय निवडणूक आयोगानं, महाराष्ट्रासह सहा राज्यांसाठी सामान्य आणि पोलीस अशा दोन श्रेणींमध्ये विशेष निरीक्षकांची नियुक्ती केली आहे. महाराष्ट्रात सेवानिवृत्त सनदी अधिकारी धर्मेंद्र एस गंगवार यांची सामान्य श्रेणीत विशेष निरीक्षक म्हणून तर भारतीय पोलिस सेवेतले निवृत्त अधिकारी एन.के. मिश्रा यांची पोलिस श्रेणीत विशेष निरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. हे विशेष निरीक्षक राज्य मुख्यालयात थांबतील आणि आवश्यकतेनुसार संवेदनशील तसंच समन्वयाची गरज असलेल्या भागांना भेट देतील, असं याबाबतच्या पत्रकात म्हटलं आहे.

****

लोकसभा निवडणुकीसाठी राज्यभरात २५४ ‘दिव्यांग नियंत्रित मतदान केंद्र’ स्थापित करण्यात येणार आहेत. केंद्रीय निवडणूक आयोगाने प्रत्येक मतदारसंघात दिव्यांगांसाठी मतदान केंद्रं असावीत यावर भर दिला असून, प्रत्येक मतदारसंघात दिव्यांग कर्मचारी नियंत्रित मतदान केंद्रंही असणार आहेत. राज्यात रत्नागिरी जिल्ह्यात सर्वात जास्त ३० मतदान केंद्रांचं नियंत्रण दिव्यांग कर्मचारी करणार आहेत. राज्यात यंदा एकूण सहा लाख ४ हजार १४५ इतके दिव्यांग मतदार आहेत.

****

निवडणूक आयोगानं लोकसभा निवडणूकीच्या प्रचारासंबंधित परवानगी देण्यासाठी सुविधा संकेतस्थळ सुरु केलं आहे. या संकेतस्थळाच्या माध्यमातून प्रचार सभा आयोजित करणं, तात्पुरतं पक्ष कार्यालय उघडणं, घरोघरी जाऊन प्रचार, वाहन वापर परवाना आणि प्रचार सामग्री वितरण करण्याची परवानगी देण्यात येत आहे. या संकेतस्थळावर सुरुवातीच्या २० दिवसांमध्ये तब्बल ७३ हजाराहून अधिक अर्ज प्राप्त झाले आहेत. त्यातील ४४ हजारांहून अधिक अर्ज मंजूर, १० हजाराहून अधिक अर्ज रद्द तर ११ हजार २०० अर्ज नामंजूर झाल्याचं, याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

देशाच्या विविध भागात लोकसभा निवडणुकीच्या प्रचारसभा होत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची महाराष्ट्रातली पहिली प्रचारसभा आज चंद्रपुरात महायुतीचे चंद्रपूरचे उमेदवार सुधीर मुनगंटीवार तसंच गडचिरोली चिमूर मतदार संघाचे उमेदवार अशोक नेते यांच्यासाठी होत आहे. या सभेच्या दृष्टीनं चोख सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली आहे. विदर्भातल्या पाच मतदार संघात १९ एप्रिलला मतदान होणार आहे.

****

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे प्रमुख केंद्रिय राज्यमंत्री रामदास आठवले येत्या १२ एप्रिल पासून छत्तीसगड, मध्यप्रदेश, आसाम आणि राजस्थान दौऱ्यावर लोकसभा निवडणूक प्रचारासाठी रवाना होणार आहेत. आठवले हे राष्ट्रीय लोकशाही आघाडी–एनडीएचे राष्ट्रीय स्तरावरचे स्टार प्रचारक आहेत. दरम्यान, १४ एप्रिल रोजी सकाळी दिल्लीत संसदेत भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडक यांना जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात आठवले उपस्थित राहणार असून, त्याच दिवशी दुपारी मुंबईत चैत्यभूमी इथं ते बाबासाहेबांना अभिवादन करणार आहेत.

****

वंचित बहुजन आघाडीने बीड लोकसभा निवडणुकीसाठी अशोक हिंगे पाटील यांना उमेदवारी जाहीर केली आहे. तसंच नागपूर जिल्ह्यातील रामटेक लोकसभा मतदारसंघात अपक्ष उमेदवार माजी सनदी अधिकारी किशोर गजभिये यांना पाठिंबा दिला आहे. पक्षाच्या प्रदेशाध्यक्ष रेखा ठाकूर यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे ही माहिती दिली.

****

निवडणूक कामकाजात सजगता आणि सकारात्मकता आवश्यक असल्याचं, छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी दिलीप स्वामी यांनी म्हटलं आहे. निवडणूक प्रशिक्षण कार्यक्रमात काल दुसऱ्या दिवशीच्या पहिल्या सत्रात ते बोलत होते. दरम्यान, औरंगाबाद पूर्व मतदारसंघात काल सकाळी २५० हून अधिक सायकलस्वारांनी मतदार जागृतीसाठी सायकल फेरी काढली.

****

लातूर लोकसभा मतदारसंघासाठी ७ मे रोजी मतदान होणार आहे. या निवडणुकीत सर्व मतदारांना मतदानाचा हक्क बजावता यावा, तसच मतदान शांततेत पार पडावं, यासाठी जिल्ह्यात ७ मे रोजी भरणारे सर्व आठवडी बाजार बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी दिले आहेत. या दिवशीचे आठवडी बाजार इतर दिवशी भरवण्यात यावेत, असंही याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

श्रोतेहो, लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर 'लोकनिर्णय महाराष्ट्राचा' हा कार्यक्रम, आकाशवाणीनं सुरू केला आहे. कार्यक्रमाच्या आजच्या भागात आपण परभणी लोकसभा मतदार संघाचा घेतलेला आढावा ऐकणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात वाजता हा कार्यक्रम ऐकता येईल.

****

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत काल मुंबईच्या वानखेडे मैदानावर झालेल्या पहिल्या सामन्यात मुंबई इंडियन्स संघानं दिल्ली कॅपिटल्स संघाचा २९ धावांनी पराभव करत या मालिकेतला आपला पहिला विजय नोंदवला. मुंबई इंडियन्सने दिलेल्या २३५ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करतांना दिल्ली कॅपिटल्स संघ २० षटकात ८ बाद दोनशे पाच धावाच करू शकला. दहा चेंडूत नाबाद ३९ धावा आणि एक बळी घेणारा रोमारिओ शेपर्ड सामनावीर ठरला.

दरम्यान, लखनऊ इथं झालेल्या दुसऱ्या सामन्यात लखनऊ सुपर जायंटस संघानं गुजरात टायटन्सचा ३३ धावांनी पराभव केला. लखनऊ सुपर जायंटसनं दिलेल्या १६३ धावांचा पाठलाग करतांना गुजरात टायटन्सचा संघ १८ षटक पाच चेंडूत सर्वबाद झाला. पाच बळी घेणारा यश ठाकूर सामनावीर पुरस्काराचा मानकरी ठरला.

****

ऑस्ट्रेलियाच्या दौऱ्यावर असलेल्या भारतीय पुरुष हॉकी संघाचा दुसरा सामना काल पर्थ इथं झाला. या सामन्यात ऑस्ट्रेलियानं भारताचा ४-२ असा पराभव करत ५ सामन्यांच्या मालिकेत २-० अशी आघाडी घेतली आहे. या मालिकेतला तिसरा सामना पर्थ इथंच १० एप्रिलला होणार आहे.

****

छत्रपती संभाजीनगर इथं डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ परिसरात घेण्यात आलेल्या दोन दिवसीय राज्यस्तरीय महिला कुस्ती स्पर्धेत अहमदनगरच्या भाग्यश्री फडने महाराष्ट्र केसरी किताब पटकावला, तर पिंपरी - चिंचवडची प्रगती गायकवाड उपविजेती ठरली. छत्रपती संभाजीनगरच्या शृंखला रत्नपारखीने ६८ किलो वजनी गटाच्या अंतिम लढतीत सुवर्ण पदक पटकावलं. कुस्तीगीर संघटना आणि नरेंद्रजी अग्रवाल प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने या स्पर्धा घेण्यात आल्या.

****

महाराष्ट्र राज्य खो-खो संघटनेच्या मंडळाची निवडणूक बिनविरोध झाली आहे. पुण्यात बालेवाडीच्या सभागृहात झालेल्या या निवडणुकीत अध्यक्ष म्हणून संजीवराजे नाईक-निंबाळकर यांची तर उपाध्यक्षपदी महेश गादेकर यांची निवड झाली आहे. हे मंडळ २०२८ पर्यंत कार्यरत राहील.

****

हिंगोली जिल्ह्यात संत नामदेवांचे जन्मस्थान असलेल्या नरसी नामदेव इथल्या यात्रेची काल्याच्या कीर्तनानं काल सांगता झाली. काल दुपारी कीर्तनानंतर शेकडो भाविकांच्या उपस्थितीत दहीहंडीचा कार्यक्रम घेण्यात आला. गेल्या तीन दिवस चाललेल्या या यात्रेत संत नामदेव महाराजांच्या पालखीची नगर प्रदक्षिणा, प्रवचन, कीर्तन यासारख्या कार्यक्रमांत भाविक मोठ्या श्रद्धेने सहभागी झाल्याचं दिसून आलं.

****

नांदेड शहरात काल जिल्हा पोलीस दलातर्फे सद्भावना फेरी काढण्यात आली. विविध धर्मांचे धर्मगुरू तसंच एकात्मतेचं दर्शन घडवणारी वेशभूषा केलेले शालेय विद्यार्थी या फेरीत मोठ्या संख्येने सहभागी झाले.

****

सार्वत्रिक निवडणुक कार्यात दिव्यांगत्वाचं भांडवल करत कुणीही गैरप्रकार करू नयेत, अशा प्रकरणात कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी, महाराष्ट्र राज्य दिव्यांग कर्मचारी संघटनेनं केली आहे. संघटनेचे प्रदेशाध्यक्ष अशोक आठवले यांनी याबाबत एक निवेदन निवडणुक आयुक्तांना पाठवलं आहे.

****

मराठवाड्यातले पहिले प्लास्टिक सर्जन दिवंगत डॉक्टर अविनाश येळीकर यांच्या पहिला स्मृतिदिनानिमित्त काल छत्रपती संभाजीनगर इथल्या महात्मा गांधी मिशन इथं, डॉक्टर अविनाश येळीकर–सर्जन गरीबांचा, मैत्र जीवांचा या गौरव ग्रंथांचं प्रकाशन करण्यात आलं. केंद्रीय अर्थराज्यमंत्री डॉ भागवत कराड यांच्या उपस्थितीत, प्लास्टिक सर्जन डॉक्टर रवीन थत्ते यांच्या हस्ते या गौरवग्रंथाचं प्रकाशन झालं. उपस्थित मान्यवरांनी डॉ येळीकरांच्या आठवणींना उजाळा दिला.

****

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे प्राध्यापक होण्यासाठीची राज्य पात्रता चाचणी अर्थात सेट परीक्षा छत्रपती संभाजीनगरातील २२ केंद्रांवर काल घेण्यात आली. या परीक्षेला ८ हजार १०५ विद्यार्थ्यांनी हजेरी लावली.

****

आंतराष्ट्रीय भरडधान्य वर्षानिमित्त जनजागृती म्हणून नाशिक इथं काल गोदावरी नदीच्या काठावर पाच हजार सहाशे २५ चौरस फुटांची रांगोळी काढण्यात आली. या रांगोळीच्या माध्यमातून भरडधान्याचं महत्त्व सांगतानाच त्यातील विविधता, पर्यावरणपूरकता, आरोग्यासाठी उपयुक्तता, आदी संदेश देण्यात आला.

****

हवामान

मराठवाड्यासह राज्याच्या काही भागात पुढच्या २४ तासांत मेघगर्जनेसह पावसाची शक्यता, हवामान विभागानं वर्तवली आहे.

****